# प्रकरण पहिले

## नागरीकरण आणि झोपडपट्ट्यांची वाढ : एक दृष्टिक्षेप

# प्रकरण पहिले

## नागरीकरण आणि झोपडपट्ट्यांची वाढ : एक दृष्टिक्षेप

**प्रस्तावना** (Introduction) :

प्रस्तुत लघुशोधनिबंधामध्ये झोपडपट्टीतील पर्यावरणाची गुणवत्ता आणि तेथे राहणाऱ्या लोकांचे आरोग्य यांच्यातील संबंध तपासण्याचा प्रयत्न केलेला आहे. मानव ज्या भौतिक पर्यावरणामध्ये राहतो त्या पर्यावरणावर मानवाचे आरोग्य अवलंबून असते. म्हणूनच पर्यावरणाची गुणवत्ता आणि मानवी आरोग्य यांचा निकटचा संबंध असलेला दिसून येतो. मानवाच्या निरोगी आरोग्यासाठी तो राहत असलेल्या ठिकाणचे पर्यावरण निरोगी असणे आवश्यक असते. मानवाच्या चांगल्या आरोग्यासाठी मानव ज्या भौतिक पर्यावरणात राहतो तेथील स्वच्छ पर्यावरण, स्वच्छ पाणीपुरवठा, वायुविजनासाठी असलेली मोकळी जागा, मुबलक सूर्यप्रकाश असणारी गुणवत्ताप्राप्त घरे, स्वच्छ राहणीमान यामुळे मानवाचे आरोग्य उत्तम राहण्यास मदत होते. मानव ज्यात सर्वाधिक वेळ व्यतीत करतो त्या घरांना मानवाच्या भौतिक पर्यावरणात महत्त्वाचे स्थान आहे. केवळ निवारा देणारी भौतिक रचना वा बांधकाम एवढाच घराचा अर्थ नसून त्यात मानव समाजाच्या शारीरिक, मानसिक व सामाजिक कल्याणासाठी आवश्यक असलेल्या सेवा सुविधा, उपकरणे व साधने इत्यादींचाही समावेश होतो. परंतु अलिकडच्या काळामध्ये वाढते औद्योगिकरण, नागरीकरण, जागेची टंचाई, वाढती लोकसंख्या इत्यादी अनेक कारणांमुळे शहरांमध्ये झोपडपट्ट्यांची मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. या झोपडपट्ट्यांमध्ये निरोगी पर्यावरणाचा अभाव असलेला दिसून येतो. भारत आणि इतर विकसनशील देशात आरोग्याच्या समस्येचे मूळ अस्वच्छता, पिण्यायोग्य पाण्याचा अभाव, अपूरी जागा, अपूरे वायुविजन आणि अपूऱ्या सूर्यप्रकाशामुळे असलेली गुणवत्ताहीन घरे, आणि अस्वच्छ राहणीमान यात सापडते.

प्रस्तुत प्रकरणामध्ये जागतिक पातळीवरील नागरीकरण प्रवाह, भारतातील नागरीकरण प्रवाह, महाराष्ट्रातील नागरीकरण, झोपडपट्टीची व्याख्या, नागरीकरण आणि झोपडपट्ट्यांची वाढ, जागतिक स्तरावरील झोपडपट्ट्यांची वाढ, भारतातील झोपडपट्ट्यांची वाढ, महाराष्ट्रातील झोपडपट्ट्यांची वाढ आणि कोल्हापूर शहरातील झोपडपट्ट्यांची वाढ या विषयीचे विवेचन केले आहे.

**१.१ जागतिक पातळीवरील नागरीकरण प्रवाह :**

सन २००० साली जगाची एकूण नागरी लोकसंख्या २.९६ दशकोटी (बिलियन) होती. ती सन २०१० पर्यंत ३.७७ दशकोटी (बिलियन) इतकी होईल. प्रत्येक वर्षी जगाच्या नागरी लोकसंख्येमध्ये ५० दशलक्ष (मिलियन) व ग्रामीण भागामध्ये ३५ दशलक्ष (मिलियन) लोकांची भर पडते. (Pranati Datta : 2006)

दक्षिण पूर्व आशियातील राष्ट्रात नागरी प्रदेशांची लोकसंख्या कशी वाढत गेली ते सारणी क्रमांक १.१.१ वरुन स्पष्ट होते.

सारणी क्रमांक १.१.१ वरुन दिसून येते की, १९५० साली जगातील २९.७ टक्के लोकसंख्या शहरात राहत होती. ती २००० साली ४७ टक्क्यांपर्यंत वाढली तर २०३० पर्यंत ती ६० टक्क्यांपर्यंत वाढण्याचे अनुमान आहे. भारताची नागरी लोकसंख्या १९५० मध्ये १७.३ टक्के इतकी होती. ती २००० सालापर्यंत २८.४ टक्क्यांपर्यंत वाढली होती. तर २०३० पर्यंत ती ४५.८ टक्के इतकी वाढेल असे अनुमान आहे.

### सारणी क्रमांक १.१.१

Trends in Urbanization in the SEA Region, by Country, 1950-2030

(नागरी लोकसंख्येची टक्केवारी)

| देशाचे नाव | १९५० | १९९० | १९९५ | २००० | २०३० |
|---|---|---|---|---|---|
| बांगलादेश | ४.२ | १९.३ | २१.८ | २४.५ | ४३.८ |
| भूतान | २.१ | ५.२ | ६.० | ७.१ | १७.९ |
| कोरिया | ३१.० | ५८.४ | ५९.१ | ६०.२ | ७२.० |
| भारत | १७.३ | २५.५ | २६.८ | २८.४ | ४५.८ |
| इंडोनेशिया | १२.४ | ३०.६ | ३५.६ | ४०.९ | ६३.५ |
| मालदिव | १०.६ | २५.९ | २५.७ | २६.१ | ४१.३ |
| म्यानमार | १६.२ | २४.६ | २५.८ | २७.७ | ४६.६ |
| नेपाळ | २.३ | ८.९ | १०.३ | ११.९ | २६.४ |
| श्रीलंका | १४.४ | २१.३ | २२.१ | २३.६ | ४१.९ |
| थायलंड | १०.५ | १८.७ | २०.० | २१.६ | ३९.१ |
| द.आशियाई प्रदेश | १५.२ | २५.७ | २७.५ | २९.६ | ४६.३ |
| जास्त विकसित प्रदेश | ५४.९ | ७३.७ | ७४.९ | ७६.० | ८३.५ |
| कमी विकसित प्रदेश | १७.८ | ३५.१ | ३७.४ | ३९.९ | ५६.२ |
| Least Developed Countries | ७.१ | २०.७ | २३.३ | २६.० | ४४.५ |
| जग | २९.७ | ४३.५ | ४५.२ | ४७.० | ६०.० |

(Source : http://w3.whosea.org/eip/tab8.htm)

दक्षिण पूर्व आशिया राष्ट्रातील नागरीकरणाचा वार्षिक वाढीचा दर सारणी क्रमांक १.१.२ वरुन स्पष्ट होतो.

**सारणी क्रमांक १.१.२**

Avreage Annual Growth Rate of the Urban Population in the SEA Region, by Country, 1985-2010

(वार्षिक वाढीचा दर टक्केवारीमध्ये)

| देश | १९८५-१९९० | १९९०-१९९५ | १९९५-२००० | २०००-२००५ | २००५-२०१० |
|---|---|---|---|---|---|
| बांगलादेश | ४.४५ | ४.०५ | ४.०८ | ३.९८ | ३.७१ |
| भूतान | ५.५८ | ४.८६ | ६.१६ | ५.९५ | ५.७७ |
| कोरिया | १.७९ | १.९२ | १.९३ | १.६२ | १.३५ |
| भारत | ३.०३ | २.८२ | २.८४ | २.८१ | २.७३ |
| इंडोनेशिया | ४.९१ | ४.५८ | ४.२२ | ३.५७ | ३.०१ |
| मालदिव | ३.५१ | २.७३ | ३.१२ | ३.५२ | ३.८६ |
| म्यानमार | २.०३ | २.०९ | २.६१ | २.८६ | ३.१० |
| नेपाळ | ५.४४ | ५.३३ | ५.२० | ५.०७ | ४.९१ |
| श्रीलंका | १.३६ | १.७४ | २.२९ | २.८४ | ३.२८ |
| थायलंड | २.६१ | २.३३ | २.५० | २.६७ | २.८३ |
| दक्षिण आशियाई प्रदेश | ३.३२ | ३.१४ | ३.१५ | ३.०२ | २.८५ |
| जास्त विकसित प्रदेश | ०.९१ | ०.७१ | ०.५६ | ०.५० | ०.४६ |
| कमी विकसित प्रदेश | ३.८२ | ३.०४ | २.८७ | २.७० | २.५६ |
| Least Developed Countries | ४.५० | ४.८१ | ४.५८ | ४.४९ | ४.२४ |
| जग | २.६९ | २.२१ | २.११ | २.०३ | १.९६ |

(Source : http://w3.whosea.org/eip/tab8.htm)

सारणी क्रमांक १.१.२ वरुन दिसून येते की, १९८५-१९९० साली जगाचा २.६९ टक्के इतका नागरीकरणाच्या वाढीचा वार्षिक दर होता. २०००-२००५ साली २.०३ टक्के असून २००५-२०१० पर्यंत नागरीकरणाच्या वाढीचा वार्षिक दर १.९६ टक्के इतका असेल असे अनुमान आहे. १९८५-१९९० साली जास्त विकसित प्रदेशाचा ०.९१ टक्के इतका नागरीकरणाच्या वाढीचा वार्षिक दर होता तर २०००-२००५ साली ०.५० टक्के असून २००५-२०१० सालामध्ये ०.४६ टक्के इतका असेल असे अनुमान आहे. १९८५-१९९० साली कमी विकसित प्रदेशाचा ३.८२ टक्के इतका नागरीकरणाच्या वाढीचा वार्षिक दर होता तर २०००-२००५ साली २.७० टक्के असून २००५-२०१० सालामध्ये २.५६ टक्के इतका असेल असे अनुमान आहे. भारतामध्ये नागरीकरणाच्या वार्षिक वाढीचा दर १९८५-१९०० साली ३.०३ टक्के इतका होता. तर २०००-२००५ साली २.८१ टक्के असून २००५-२०१० साली २.७३ टक्के इतका असेल असे अनुमान आहे.

**१.२ भारतातील नागरीकरण प्रवाह :**

एकोणिसाव्या शतकापर्यंत भारतातील नगरांची संख्या व नगरातील राहणाऱ्यांचे प्रमाण अत्यल्प होते. पण ब्रिटीश राजवटीत शहरांची संख्या व शहरी लोकसंख्येचे प्रमाण वाढले. स्वातंत्र्योत्तर काळात तर हे प्रमाण अधिकच वाढत गेले. सन १९०१ साली भारतातील शहरांची संख्या १८२७ होती. तर सन २००१ मध्ये शहरांची संख्या ५१६१ इतकी झाली. सन १९०१ मध्ये २.५८ कोटी तर सन २००१ मध्ये २८.५३ कोटी लोक नागरी भागामध्ये राहत होते. सन २००१ च्या जणगणनेनुसार भारताची एकूण लोकसंख्या १०२७ दशलक्ष (मिलियन) होती. त्यापैकी २८५ दशलक्ष (मिलियन) लोक नागरी भागामध्ये तर ७४२ दशलक्ष (मिलियन) लोक ग्रामीण भागामध्ये राहत होते. (Pranati Datta : 2006) भारतातील नागरीकरणाची वाढ पुढील सारण्यांवरुन स्पष्ट होते.



HAPUR

भारतातील सन १९०१ ते सन २००१ या जणगणना वर्षातील शहरांची संख्या, एकूण लोकसंख्या, नागरी लोकसंख्या व ग्रामीण लोकसंख्या सारणी क्रमांक १.२.१ वरुन स्पष्ट होते.

**सारणी क्रमांक १.२.१**

भारतातील १९०१ ते २००१ या जणगणना वर्षातील शहरांची संख्या, एकूण लोकसंख्या, नागरी लोकसंख्या व ग्रामीण लोकसंख्या

(Population of India by Residance)

१९०१-२००१

| जणगणना वर्षे | शहरांची संख्या | एकूण लोकसंख्या | नागरी लोकसंख्या | ग्रामीण लोकसंख्या |
|---|---|---|---|---|
| १९०१ | १८२७ | २३८३९६३२७ | २५८५१८७३ | २१२५४४४५४ |
| १९११ | १८२५ | २५२०९३३९० | २५९४१६३३ | २२६१५१७५७ |
| १९२१ | १९४९ | २५१३२१२१३ | २८०८६१६७ | २२३२३५०४६ |
| १९३१ | २०७२ | २७८९७७२३८ | ३३४५५९८९ | २४५५२१२४९ |
| १९४१ | २२५० | ३१८६६०५८० | ४४१५३२९७ | २७४५०७२८३ |
| १९५१ | २८४३ | ३६१०८८०९० | ६२४४३७०९ | २९८६४४३८१ |
| १९६१ | २३६३ | ४३९२३४७७१ | ७८९३६६०३ | ३६०२९८१६८ |
| १९७१ | २५९० | ५९८१५९६५२ | १०९११३९७७ | ४८९०४५६७५ |
| १९८१ | ३३७८ | ६८३३२९०९७ | १५९४६२५४७ | ५२३८६६५५० |
| १९९१ | ३७६८ | ८४४३२४२२२ | २१७१७७६२५ | ६२७१४६५९७ |
| २००१ | ५१६१ | १०२७०१५२४७ | २८५३५४९५४ | ७४१६६०२९३ |

(Source : Pranati Datta : 2006)

भारतातील सन १९०१ ते २००१ सालातील नागरीकरणाचा प्रवेग सारणी क्रमांक १.२.२ वरुन स्पष्ट होतो.

**सारणी क्रमांक १.२.२**

भारतातील १९०१-२००१ सालातील नागरीकरणाचा प्रवेग

Degree/Index of Urbanization

१९०१-२००१

| जणगणना वर्षे | नागरी (%) | ग्रामीण(%) | ग्रामीण-नागरी गुणोत्तर (%) |
|---|---|---|---|
| १९०१ | १०.८४ | ८९.१५ | १२.१६ |
| १९११ | १०.२९ | ८९.७१ | ११.४७ |
| १९२१ | ११.१८ | ८८.८२ | १२.५८ |
| १९३१ | ११.९९ | ८८.०१ | १३.६३ |
| १९४१ | १३.८६ | ८६.१४ | १६.०८ |
| १९५१ | १७.२९ | ८२.७१ | २०.९१ |
| १९६१ | १७.९७ | ८२.०३ | २१.९१ |
| १९७१ | १८.२४ | ८१.७६ | २२.३१ |
| १९८१ | २३.३३ | ७६.६६ | ३०.४४ |
| १९९१ | २५.७२ | ७४.२८ | ३४.६३ |
| २००१ | २७.७८ | ७२.२२ | ३८.४७ |

(Source : Pranati Datta : 2006)

सारणी क्रमांक १.२.२ वरुन दिसून येते की, भारतातील नागरीकरणाचा प्रवेग १९०१ साली नागरी भागामध्ये १०.८४ टक्के व १९५१ साली १७.२९ टक्के होता. त्यामध्ये २००१ साली वाढ होऊन तो २७.७८ टक्क्यांपर्यंत वाढलेला दिसून येतो.

भारतातील सन १९०१ ते २००१ या जणगणना वर्षातील लोकसंख्येची दश वार्षिक वाढ सारणी क्रमांक १.२.३ वरुन स्पष्ट होते.

सारणी क्रमांक-१.२.३

Annual Growth Rate of Population by Residence

| वर्ष | एकूण लोकसंख्येमध्ये वाढ (%) | नागरी लोकसंख्येमध्ये वाढ (%) | ग्रामीण लोकसंख्येमध्ये वाढ (%) |
|---|---|---|---|
| १९०१-१९११ | .५१ | .०३ | .६२ |
| १९११-१९२१ | -०.०३ | .७९ | -०.१३ |
| १९२१-१९३१ | १.०४ | १.७५ | .९५ |
| १९३१-१९४१ | १.३३ | २.७७ | १.१२ |
| १९४१-१९५१ | १.२५ | ३.४७ | .८४ |
| १९५१-१९६१ | १.९६ | २.३४ | १.८८ |
| १९६१-१९७१ | ३.०९ | ३.२४ | ३.०५ |
| १९७१-१९८१ | १.३३ | ३.७९ | .६९ |
| १९८१-१९९१ | २.१२ | ३.०९ | १.८० |
| १९९१-२००१ | १.९६ | २.७३ | १.६८ |

(Source : Pranati Datta : 2006)

भारतातील सन १९९१ च्या जणगणना अहवालानुसार वर्ग I शहरांमध्ये २६ टक्के, वर्ग IV शहरांमध्ये २१ टक्के, आणि वर्ग V शहरांमध्ये २० टक्के लोक राहत होते.१९९१ च्या जनगणनेनुसार देशातील ६५ टक्के नागरी लोकसंख्या १,००,००० लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या वर्ग I शहरामध्ये होती तर, २००१ मध्ये ६९ टक्के लोक वर्ग I शहरांमध्ये राहत होते. ( Pranati Datta : 2006)

भारतामध्ये सन १९५१ मध्ये १ दशलक्ष (मिलियन) पेक्षा जास्त लोकसंख्या असलेली ५ शहरे होती, १९९१ मध्ये २३ शहरे होती तर २००१ मध्ये ३५ शहरे होती. एकूण नागरी लोकसंख्येच्या ३७ टक्के लोकसंख्या या मिलियन प्लस लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये आहे. २००१ च्या जनगणनेनुसार १२ नव्या मिलियन प्लस शहरांची नोंद झाली : आग्रा, मीरत, नाशिक, जबलपूर, जमशेदपूर, आसनसोल, धनबाद, फरिदाबाद, अलाहबाद, अमृतसर, विजयवाडा आणि राजकोट.

भारतातील दशलक्ष (मिलियन) प्लस शहरांची लोकसंख्या सारणी क्रमांक १.२.४ वरुन स्पष्ट होते.

**सारणी क्रमांक-१.२.४**

Million-Plus Cities in India : 1951-2001

**(लोकसंख्या मिलियन मध्ये)**

| अ.क्र. | शहराचे नाव | १९५१ | १९७१ | १९९१ | २००१ |
|---|---|---|---|---|---|
| १ | मुंबई | २.९७ | ५.९७ | १२.५७ | १६.३७ |
| २ | कलकत्ता | ४.६७ | ७.४२ | १०.९२ | १३.२२ |
| ३ | दिल्ली | १.४४ | ३.६५ | ८.३८ | १२.७९ |
| ४ | मद्रास | १.५४ | ३.१७ | ५.३६ | ६.४२ |
| ५ | हैद्राबाद | १.१३ | १.८० | ४.२८ | ५.५३ |
| ६ | बेंगलोर | ०.७९ | १.६६ | ४.०९ | ५.६९ |
| ७ | अहमदाबाद | ०.८८ | १.७५ | ३.३० | ४.५२ |
| ८ | पुणे | ०.६१ | १.१४ | २.४९ | ३.७५ |
| ९ | कानपूर | ०.७१ | १.२८ | २.११ | २.६९ |
| १० | नागपूर | ०.४८ | ०.९३ | १.६६ | २.१२ |

(Source : Pranati Datta : 2006)



KOLHAPUR

भारतातील नागरीकरणास वाढती लोकसंख्या, दारिद्र्य आणि ग्रामीण-नागरी स्थलांतर हे घटक कारणीभूत आहेत. वाढत्या नागरीकरणामुळे झोपडपट्ट्यांध्ये वाढ होऊन दारिद्र्य, बेकारी, असमानता व नागरी लोकांच्या जीवनाची गुणवत्ता खालावलेली आहे. नागरीकरणामुळे भारतात पुढील समस्या निर्माण झालेल्या आहेत.

१) घरांची समस्या

२) झोपडपट्ट्यांमध्ये वाढ

३) वाहतूकीची समस्या

४) पाणीपूरवठा आणि स्वच्छतेचा अभाव

५) पाणीप्रदूषण आणि हवा प्रदूषण

६) मूलभूत सेवा-सुविधांचा अभाव इत्यादी

**१.३ महाराष्ट्रातील नागरीकरण :**

सन २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील ४२.४ टक्के (४.११ कोटी) लोकसंख्या नागरी आहे. सन १९९१ मध्ये महाराष्ट्राची नागरी लोकसंख्या ३८.७ टक्के होती तर २००१ मध्ये ४२.४ टक्के झाली होती. महाराष्ट्राचा नागरी लोकसंख्येमध्ये आंध्रप्रदेश (४३.९ टक्के) नंतर दुसरा क्रमांक लागतो. महाराष्ट्राच्या एकूण नागरी लोकसंख्येपैकी निम्मी लोकसंख्या सात शहरांमध्ये एकवटलेली दिसून येते. त्यामध्ये मुंबई, पुणे, नागपूर, ठाणे, कल्याण-डोंबिवली, नाशिक, पिंपरीचिंचवड या शहरांचा समावेश आहे. या शहरांची लोकसंख्या ही १ दशलक्ष (मिलियन) पेक्षाही जास्त आहे. सारणी क्रमांक १.३.१ वरुन या शहरांची सन १९९१ व सन २००१ मधील लोकसंख्येची वाढ स्पष्ट होते.

## सारणी क्रमांक-१.३.१

Cities with Million Plus Population

| शहरे | १९९१ (लाखांमध्ये) | २००१ (लाखांमध्ये) | Decennial Growth (%) |
|---|---|---|---|
| मुंबई | ९९.१० | ११९.१४ | २०.२३ |
| नागपूर | १६.२२ | २०.५१ | २६.४५ |
| पुणे | १५.६० | २५.४० | ६२.८७ |
| कल्याण-डोंबिवली | १०.१४ | ११.९३ | १७.६७ |
| ठाणे | ७.९७ | १२.६२ | ५८.३६ |
| नाशिक | ६.४७ | १०.७७ | ६६.४८ |
| पिंपरी-चिंचवड | ५.१६ | १०.०६ | ९५.०६ |

(Source: http://maharashtra.gov.in/english/ecosurvey1/esm e/cha03e.pdf)

सन १९०१ पासून कोल्हापूर शहराची लोकसंख्या कशी वाढत गेली हे सारणी क्रमांक १.३.२ वरुन स्पष्ट होते.

## सारणी क्रमांक-१.३.२

### कोल्हापूर शहराची लोकसंख्या (१९०१-२००१)

| अ. क्र. | जनगणना वर्ष | लोकसंख्या | Decadal Variation | Growth in Percent | Gobb's Growth Rate |
|---|---|---|---|---|---|
| १ | १९०१ | ०५४३७३ | - | - | - |
| २ | १९११ | ०४२२०१८ | -१२३५५ | -२२.७२ | -२.५० |
| ३ | १९२१ | ०५२२९९ | १०२८१ | २४.४७ | २.१८ |
| ४ | १९३१ | ०६६७२८ | १४४२९ | २७.५९ | २.४२ |
| ५ | १९४१ | ०९३०३२ | २६३०४ | ३९.४२ | ३.२९ |
| ६ | १९५१ | १३६८३५ | ४३८०३ | ४७.०८ | ३.८१ |
| ७ | १९६१ | १८७४४२ | ५०६०७ | ३६.९८ | ३.०८ |
| ८ | १९७१ | २५९०५० | ७१६८० | ३८.२० | ३.२१ |
| ९ | १९८१ | ३४०६२५ | ८१५८५ | ३१.४९ | २.७२ |
| १० | १९९१ | ४०६३७० | ६५७४५ | १९.३० | १.७६ |
| ११ | २००१ | ४८५१८३ | - | - | - |

Source : S. B. Zodage(2001) : 'Impact of Urban Growth on Environment :A case Study of Kolhapur', Unpublished Ph.D. Thesis, Shivaji University Kolhapur.

### १.४ झोपडपट्टी म्हणजे काय ?

झोपडपट्टी म्हणजे भयानक विषमतेचे प्रतीक आहे. झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या लोकांमध्ये पराकोटीचे दारिद्र्य असलेले दिसून येते. पराकोटीचे दारिद्र्य व बेकारी या वैशिष्ट्यांनी युक्त या झोपडपट्ट्यांमध्ये प्रकाश, स्वच्छता, रस्ते, शाळा, दवाखाने इत्यादी गोष्टींचा पूर्णपणे अभाव असतो.

भारतात झोपडपट्टीस वेगवेगळ्या संज्ञा वापरल्या जातात. भारतामध्ये दिल्लीतील झोपडपट्टीस कटरास, गल्ली, जुग्गी झोपडपट्टी, मुंबईमध्ये चाळ, कानपूरमध्ये (Ahtas), कलकत्यामध्ये बस्ती, मद्रासमध्ये चेरीस, बेंगलोरमध्ये केरीस, आंध्रप्रदेशमध्ये पेटास व महाराष्ट्रामध्ये झोपडपट्टी अशी संज्ञा वापरली जाते.(Sudha Kaldate and B. L. Joshi : 1989)

#### १.४.१ झोपडपट्टीची व्याख्या :- Definition of Slum

१) "आरोग्यघातक, अस्वच्छ वस्त्या, दारिद्र्य आणि सामाजिक बेशिस्त यांनी युक्त असलेला बकाल नागरी किंवा उपनागरी भाग म्हणजे झोपडपट्टी होय."(स.मा.गर्गे:१९८९:३)

२) According to UNESCO document, "a slum is a building, a group of buildings, or area characterized by over crowding, deterioration, unsanitary conditions or absenece of facilities of amenities which because of these conditions or any of them, endanger the health safety or morals of its in habitants or the community"(Desai A. R. and Pillai S. D. : 1972)

३) According to slum Area (Improvement and Clearance) Act of 1956, which says, "areas where buildings are unfit for human habitation, or are by reason of dilapidation, over crowding, design of buildings, narrowness of streets, lack of ventilation, light or sanitary facilities or



KOLHAPUR

any combination of these factors, are detrimental to safety, health or morals". (Sunil Kumar Karan, Shigeo Shikura, Hideki Harada : 2003)

४) According to the Census of India, 2001, "a slum is a compact area of at least 300 population or about 60-70 households of poorly built congested tenements, in unhygienic environment, usually with inadequate infrastructure and lacking in proper sanitary and drinking water facilities". (S. Sundari : 2003)

### १.४.२ झोपडपट्टीची प्रमुख वैशिष्ट्ये :

Characteristics of Slum

झोपडपट्टीची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत. (S. Sundari : 2003)

१) मोडकळीस आलेली आणि कमकुवत अशी घरांची रचना
(dilapidated and infirm housing structures)

२) वायुविजनाचा अभाव (Poor ventilation)

३) अतिगर्दी (accure over – corwding)

४) रस्त्यांची चुकीची रचना (faulty alignment of streets)

५) प्रकाशाचा अभाव (inadequate lighting)

६) शुद्ध पाण्याचा अभाव (inadequate lighting)

७) शौचालयांचा अभाव (absence of toilet facilities)

८) मूलभूत सेवा सुविधांचा अभाव
(non- availability of basic physical and social services)

आरोग्य हीच खरी संपत्ती होय. अशी म्हण भारतात रुढ आहे. परंतु अलिकडच्या काळामध्ये वाढत्या लोकसंख्येमुळे उद्‌भवलेली जागेची टंचाई आणि औद्योगिकरणामुळे वाढलेला शहरांचा न पेलवणारा आवाका यामुळे शहरांमध्ये झोपडपट्टीची समस्या मोठया

प्रमाणात निर्माण झाली आहे. मानवाचे आरोग्य मुख्यत: तो राहत असलेल्या घरावर व तेथील पर्यावरणावर अवलंबून असते. परंतु झोपडपट्टीमध्ये घर नामक ज्या झोपड्या असतात त्या झोपड्या आरोग्याचे रक्षण करण्यास सर्वस्वी असमर्थ असतात. सर्वसाधारणपणे, झोपडपट्टीतील जीवन निकृष्ठ दर्जाचे असते. येथे राहणाऱ्या लोकांना मूलभूत सुविधांपासून वंचित राहावे लागते. येथे पिण्याचे स्वच्छ पाणी, मलमूत्र विसर्जनाची सोय, गटारे, सांडपाण्याची व्यवस्था व आरोग्यविषयक सुविधांचा अभाव असलेला दिसून येतो. दोन झोपड्यांमध्ये अंतर जवळ जवळ नसतेच. रस्ते अतिशय अस्वच्छ व अरुंद असतात. झोपड्या एकमेकींना चिकटून असतात. त्यामुळे प्रकाशाचा शिरकावही होत नाही. त्यामुळे तेथील लोकांना विविध रोगांना सामोरे जावे लागते. झोपडपट्टी म्हणजे आजारांचे माहेरघरच असते. येथे रोगराईचा प्रसार त्वरित होतो. परंतु येथे स्वास्थ्यासाठी असलेले डॉक्टर, दवाखाने यांचा अभाव दिसून येतो. अस्वच्छ पाणीपुरवठा, कोंदट वातावरण, शौचालयांचा अभाव, शारीरिक स्वच्छतेकडे दुर्लक्ष यामुळे झोपडपट्टीतील लोकांचा आरोग्य दर्जा खालावलेला दिसून येतो. कारण आरोग्याची मुख्य शत्रू जी अस्वच्छता तीच येथे ठाण मांडून बसलेली आढळते.

**१.५ नागरीकरण आणि झोपडपट्ट्यांची वाढ :**

झोपडपट्ट्यांची वाढ हा नागरीकरणाचा एक अपरिहार्य परिणाम आहे. जागतिक स्तरावर, भारताच्या संदर्भात, महाराष्ट्र राज्यात तसेच कोल्हापूर शहरात नागरी लोकसंख्या कशी वाढत गेली याचा आढावा मागील भागात घेतला आहे. आता वाढत्या नागरीकरणाबरोबरच झोपडपट्ट्या कशा वाढत गेल्या हे पाहू.

**१.५.१ जागतिक स्तरावरील झोपडपट्ट्यांची वाढ :**

झोपडपट्ट्यांची वाढ ही एक जागतिक घटना आहे. जगातील जवळ जवळ सर्व शहरांमध्ये झोपडपट्टी असलेली दिसून येते. याचा विस्तार मुंबई ते बरमुडा आणि मॅन्चेस्टर ते मनिला असा झालेला दिसून येतो. (Desai A. R. and Pillai S. D:1970)

आठराव्या शतकाच्या मध्यापासून युरोप खंडात औद्योगिक क्रांतीचा प्रारंभ झाला. उदयोगधंद्यांमध्ये नवी यंत्रे प्रचारात येऊन उत्पादनात अभूतपूर्व वाढ होऊ लागली. त्यातून औद्योगिक विकास अत्यंत झपाटयाने होऊन शहरांची वाढही वेगाने होऊ लागली. इंग्लंडमध्ये जमिनदारांनी सर्व शेतीक्षेत्र आत्मसात करुन कुळांना बाहेर काढले. त्यामुळे ग्रामीण भागात बेकारी निर्माण झाली, तर शहरी भागात उद्योगधंदे वाढले. ग्रामीण बेकारांना पोटापुरती रोजगारी मिळू लागली. त्यांचे लोंढे शहरांकडे धावू लागले. शहरांमध्ये त्यांच्या निवासाची काहीच सोय नसल्याने झोपडपट्ट्यांना प्रारंभ झाला. युरोपमधील अनेक मोठ्या शहरांमध्ये अशा गलिच्छ वस्त्या वाढू लागल्या, तेव्हाच इंग्लंडमधील काही विचारवंतानी माणुसकीच्या दृष्टीकोनातून या प्रश्नावर लक्ष केंद्रीत केले. कामगारांना माफक भाड्यात मिळू शकतील अशी घरे उभारण्याची निकड व्यक्त केली गेली. इ. स. १८४५ मध्ये कामगारांच्या वस्त्या सुधारण्याकरिता इंग्लंडमध्ये एक मंडळ स्थापन करण्यात आले व ब्रिटिश संसदेत इ. स. १८५१ मध्ये 'कामगार घरबांधणी कायदा' संमत करण्यात आला. त्या कायद्यान्वये कामगारांकरिता बांधावयाच्या घरात काही किमान सुविधा असणे बंधनकारक करण्यात आले. इ. स. १८६८ मध्ये झोपडपट्ट्या उठविण्याकरिता, पाडण्याकरिता किंवा सुधारण्याकरिता कायदा करण्यात आला. विसाव्या शतकाच्या प्रारंभी झोपडपट्ट्या नाहीशा करण्याकरिता व आदर्श वस्त्या उभारण्याकरिता खूपच प्रयत्न करण्यात आले.

आशियाई देशांमध्ये दुसऱ्या महायुद्धानंतर औद्योगिकरणाला अधिक चालना मिळाली. प्रमुख शहरांमध्ये कारखानदारी वाढू लागली. खेड्यातील भूमीहिन वर्ग मोठ्या संख्येने शहराकडे धाव घेऊ लागला. खेड्यातील हस्तव्यवसायही मोडकळीला आले. त्यामुळे कारागीर वर्गही शहरात काम मिळविण्यासाठी गर्दी करु लागला. त्यांना राहण्यासाठी घरांची सोय नव्हती. कारखानदारीच्या आरंभीच्या विकास काळात अशी सोय करणे अविकसित देशांना शक्यही नव्हते. त्यातून शहराभोवती व शहरांतही जेथे

मोकळी जागा मिळेल तेथे झोपड्या टाकून कामगार राहू लागले. परिणामी, झोपडपट्ट्यांची संख्या वाढत गेली आणि अनेक सामाजिक आर्थिक व राजकीय परिणाम घडू लागले. (स. मा. गर्गे : १९८९:३)

नागरीकरण हे औद्योगिक क्रांतीचे अपत्य मानवी जीवनाला शापग्रस्त ठरण्याची भीती निर्माण झाली आहे. यंत्रोत्पादनाचा प्रचंड वेग व त्यामधून घडून आलेला तांत्रिक बदल, प्रचंड वेगाने गतिमान झालेली आधुनिक उद्योगधंद्याची वाढ, शिक्षणाचा मूलगामी प्रचार व प्रसार, मुक्त अर्थव्यवस्था या व अशा अनेकविध कारणांमुळे खेड्यातील माणूस रोजीरोटीच्या अपेक्षेने शहरांकडे प्रचंड वेगाने स्थलांतरित होऊ लागला असल्याने शहरांची लोकसंख्या भयानक प्रमाणात वाढू लागली आहे. या वाढत्या अतिरिक्त लोकसंख्येमुळे शहरांमध्ये झोपडपट्टीची समस्या मोठ्या प्रमाणात भेडसावू लागली आहे.

सध्या जगातील १ दशकोटी (बिलियन) लोक हे शहरातील झोपडपट्ट्यांमध्ये राहतात. ही संख्या पुढील २५ वर्षात दुप्पट होईल. आफ्रिकेतील ७१ टक्के लोक झोपडपट्टीमध्ये राहतात. तर नैरोबीमधील नागरी लोकसंख्या ही फक्त ५ टक्के जमिनीवर राहते. (Anna Tibaijuka : Cities without slums) युनायटेड नेशन हौसिंग एजन्सीच्या मते, सन २०५० पर्यंत जगातील ३ दशकोटी (बिलियन) लोक हे झोपडपट्टीमध्ये राहत असतील. (Nairobi: 2005)

सध्या जगामध्ये १० दशलक्ष (मिलियन) पेक्षा जास्त लोकसंख्या असलेली २० मोठी शहरे आहेत. (www.unfa.org/pds/urbanization.htm) सन २००० साली १० दशलक्ष (मिलियन) पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये टोकियो (२६.४ दशलक्ष मिलियन), मेकिस्को सिटी (१८.१), मुंबई (१८.१), साओ पाउलो (१७.८), शांघाय (१७), न्यूयॉर्क (१६.६), लेगॉस (१३.४), लॉस ॲंगेल्स (१३.१), कलकत्ता (१२.९), कराची (११.८), दिल्ली (११.७), जकार्ता (११), ओसाका (११), मेट्रो मनिला (१०.९), बिजिंग

(१०.८), रिओ दि जानेरो (१०.६), कैरो (१०.६), या शहरांचा क्रमांक लागतो. (http://web-unfa.org/swp/2001/english/tables.html)

युनायटेड नेशनस् ह्युमन सेटलमेंट प्रोग्रॅम नुसार (UN-HABITAT), नैरोबीमधील कैबेरा (Kibera) ही जगातील सर्वात मोठी झोपडपट्टी आहे. त्यानंतर भारतातील मुंबई शहरातील धारावी झोपडपट्टी व पाकिस्तानमधील Darangi या झोपडपट्ट्यांचा क्रमांक लागतो.(http://www.countercurrents.org/hr-whelan190204.htm)

दि चॅलेंज ऑफ स्लमस् : ग्लोबल रिपोर्ट ऑन ह्यूमन सेटलमेंटस् २००३ (The Challenge of Slums : Global Report on Human Settlements 2003) या युनायटेड नेशनच्या ह्यूमन सेटलमेंटस् प्रोग्रॅम (UN-HABITAT) च्या ०६ ऑक्टोबर २००३ च्या रिपोर्टनुसार सन २००१ मध्ये जगातील ९२४ दशलक्ष (मिलियन) लोक झोपडपट्टीमध्ये राहतात. आशिया खंडामध्ये जगातील सर्वात जास्त लोक झोपडपट्टीमध्ये राहतात. येथे ५५४ दशलक्ष (मिलियन) लोक झोपडपट्टीमध्ये राहतात. तर आफ्रिकेमध्ये १८७ दशलक्ष (मिलियन), लॅटीन अमेरिका व कैरेबियनमध्ये १२८ दशलक्ष (मिलियन) तर युरोप आणि इतर विकसित देशातील ५४ दशलक्ष (मिलियन) लोक झोपडपट्टीत राहतात. (Key Findings of the UN-HABITAT 2003 Global Report on Human Settlements)

**१.५.२ भारतातील झोपडपट्टयांची वाढ :**

तिसऱ्या जगातील प्रमुख मोठ्या शहरांमधून विशेषत: भारतासारख्या विकासाच्या मार्गावर वाटचाल करणाऱ्या देशांच्या मोठ्या शहरातून तर झोपडपट्टी हा गंभीर आणि चिंतेचा विषय बनला आहे. मोठ्या शहरांमध्ये वाढत्या लोकसंख्येमुळे उद्‌भवलेली जागेची टंचाई, सामाजिक वर्गामध्ये पडलेली प्रचंड दरी आणि औद्योगिकरणामुळे वाढलेला शहरांचा न पेलवणारा आवाका यामुळे शहरात निर्माण झालेली झोपडपट्टी हा सामाजिक जीवनात ज्वलंत प्रश्न आहे. ग्रामीण भागातून आलेला पोटार्थी वर्ग आणि गेल्या तीन

दशकात झालेला घरांचा अपुरा पुरवठा या कारणांमुळे भारतात ही समस्या अधिकाधिक उग्र स्वरुप धारण करु लागली आहे. पारंपारिक पद्धतीने ज्यांना घर बांधने परवडत नाही आणि ज्यांच्यासाठी कोणतीही घरबांधणीची सवलतीची योजना नाही, त्यांना नाइलाजाने झोपडी बांधून राहावे लागते. दारिद्र्यरेषेखाली जीवन जगणाऱ्यांना तर झोपडीतच राहावे लागते. परंतु त्यात नाइलाजाने राहणाऱ्या लोकांची संख्याही फार मोठी आहे.

भारतातील लहान-मोठ्या सर्व शहरांमधून प्राण्यापेक्षाही निकृष्ट स्वरुपाचे जीवन माणूस जगत आहे. भयानक विषमतेमुळे एकीकडे श्रीमंती तर दुसरीकडे गरीबी वाढत आहे. नगराचे काही भाग कायमपणे दुर्लक्षीले जात आहेत. विकासाची गती सर्व विभागात सारखी राहत नाही. एकीकडे ती गतीशील तर दुसरीकडे मंदावलेली असते. शहराच्या काही भागात सर्व सोयीने परिपूर्ण असलेली वस्ती असते. तर काही भाग बकाल स्थितीतच असतो. या बकाल वस्तीतच अनेक समस्या निर्माण होतात. या बकाल वस्त्या झोपडपट्ट्या या नावाने ओळखल्या जातात. या झोपडपट्ट्या म्हणजे भयानक विषमतेचे प्रतीक आहे. येथे राहणारे लोक अतिशय दरिद्री अवस्थेत जगत असतात. येथे प्रकाश, स्वच्छता, रस्ते, शाळा, दवाखाने, इत्यादी गोष्टींचा पूर्णपणे अभाव असतो.

**१.५.२.१ सन २००१ च्या जणगणनेनुसार भारतातील झोपडपट्ट्यांच्या लोकसंख्येचा महत्त्वाचा भाग :**

भारताच्या जणगणनेमध्ये प्रथमच झोपडपट्टीची लोकसंख्या प्रत्यक्षपणे गणली गेली. त्यातील महत्त्वाचा भाग पुढीलप्रमाणे :

- सन २००१ च्या जणगणनेनुसार भारतातील २६ राज्ये व केंद्रशासित प्रदेशामधील ६४० शहरांमधील झोपडपट्टींची लोकसंख्या नोंदविली आहे. त्यामध्ये आंध्रप्रदेश राज्यात सर्वाधिक ७७ शहरे आहेत. त्याखालोखाल उत्तरप्रदेशमध्ये ६९ शहरे, तामिळनाडूमध्ये ६३ शहरे आणि महाराष्ट्रातील ६१ शहरांचा त्यामध्ये समावेश आहे.



SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

- २००१ च्या जणगणनेनुसार भारतातील एकूण लोकसंख्येच्या ४२.६ टक्के लोक झोपडपट्टीमध्ये राहतात. भारतात महाराष्ट्रामध्ये सर्वाधिक ११.२ दक्षलक्ष (मिलियन) लोक त्याखालोखाल आंध्रप्रदेशमध्ये ५.२ दक्षलक्ष (मिलियन), उत्तरप्रदेशमध्ये ४.४ दक्षलक्ष (मिलियन) लोक झोपडपट्टीमध्ये राहतात.

- २००१ च्या जणगणनेनुसार भारतातील २७ शहरांमधील झोपडपट्टीची लोकसंख्या १७.७ दक्षलक्ष (मिलियन) इतकी असून या शहरांमध्ये झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या लोकांची लोकसंख्या १ दक्षलक्ष (मिलियन) पेक्षाही जास्त आहे. त्यामध्ये महाराष्ट्रातील मुंबई या शहरामध्ये सर्वाधिक ६.५ दक्षलक्ष (मिलियन), त्याखालोखाल दिल्ली १.९ दक्षलक्ष (मिलियन), कलकत्ता १.५ दक्षलक्ष (मिलियन), आणि चेन्नईमधील ०.८ दक्षलक्ष (मिलियन) लोक झोपडपट्टीत राहतात.

- भारतामध्ये सहा वर्षे वयाखालील ६ दक्षलक्ष (मिलियन) मुले झोपडपट्टीमध्ये राहतात. त्यापैकी महाराष्ट्रातील झोपडपट्ट्यांमध्ये १.६ दक्षलक्ष (मिलियन)मुले राहतात.

- भारतामध्ये झोपडपट्टीच्या एकूण लोकसंख्येपैकी ७.४ दक्षलक्ष (मिलियन) (१७.४ टक्के) इतकी लोकसंख्या अनुसूचीत जातींची व १ दक्षलक्ष (मिलियन) (२.४ टक्के) लोकसंख्या अनुसूचीत जमातींची आहे.

- झोपडपट्टीमधील साक्षरतेचे प्रमाण ७३ टक्के इतके असून त्यापैकी ८०.७ टक्के पुरुष व ६४.४ टक्के स्त्रिया साक्षर आहेत. (Census of India 2001)

## १.५.२.२ सन २००१ च्या जणगणनेनुसार भारतातील प्रमुख राज्यातील झोपडपट्टीची लोकसंख्या

### सारणी क्रमांक १.५.२.२

(लोकसंख्या लाखामध्ये)

| अ. क्र. | राज्याचे नाव | १९८१ | | | १९९१ | | | २००१ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नागरी लोकसंख्या | झोपड-पट्टीची लोकसंख्या | टक्के (%) | नागरी लोकसंख्या | झोपड पट्टीची लोकसंख्या | टक्के (%) | नागरी लोकसंख्या | झोपड पट्टीची लोकसंख्या | टक्के (%) |
| १ | महाराष्ट्र | १९.९३६ | ४३.१४९ | १९.६ | ३०५.४१६ | ७८.७२४ | २५.८ | ४१६.१५५ | १०७.३६७ | २५.८ |
| २ | उत्तरप्रदेश | १९८.९९१ | २५.८०० | १३.० | २७६.०५९ | ५८.३९१ | २१.१ | ३६५.३९७ | ७७.०९८ | २१.१ |
| ३ | तामिळनाडू | १५९.५१९ | २६.७६० | १६.८ | १९०.७७६ | ३५.७१३ | १८.७ | २३३.०८० | ४३.५८५ | १८.७ |
| ४ | आंध्रप्रदेश | १२४.८७६ | २८.५७९ | २२.९ | १७८.८७१ | ४३.१३३ | २४.१ | २४९.६५४ | ६०.१६६ | २४.१ |
| ५ | कर्नाटक | १०७.२९६ | ५.७४५ | ५.४ | १३९.०७८ | १२.९३४ | ९.३ | १९०.९८९ | १७.७६१ | ९.३ |
| ६ | गुजरात | १०६.०१७ | १५.३१६ | १४.४ | १४२.४६१ | २५.८१४ | १८.१ | १८९.९९३ | ३४.३८८ | १८.१ |
| ७ | मध्यप्रदेश | १०५.८६५ | १०.७४९ | १०.२ | १५३.३८८ | २१.०२९ | १३.७ | २०४.०५० | २७.९५४ | १३.७ |
| ८ | बिहार | ८७.१९० | ३२.६९९ | ३७.५ | ११३.५३० | २६.९०६ | २३.७ | १४९.५५६ | ३५.४४४ | २३.७ |
| ९ | राजस्थान | ७२.१०५ | १०.२५२ | १४.२ | १००.६७१ | २४.००० | २३.८ | १३७.१९३ | ३२.६५१ | २३.८ |
| १० | दिल्ली | ५७.६८५ | १८.००० | ३१.२ | ८४.७१६ | २२.४८० | २६.५ | १२२.८९१ | ३२.५६६ | २६.५ |

(Source : http://mospi.nic.in/comenv2000tab7.2.11.htm)

## १.५.२.३ सन २००१ च्या जणगणनेनुसार भारतातील प्रमुख महानगरातील झोपडपट्टीची लोकसंख्या

(लोकसंख्या लाखामध्ये)

| अ. क्र. | शहराचे नाव | १९८१ | | | १९९१ | | | २००१ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एकूण लो. | झोपड-पट्टीची लो. | टक्के | एकूण लो. | झोपड-पट्टीची लो. | टक्के | एकूण लो. | झोपड-पट्टीची लो. | टक्के |
| १ | कलकत्ता | ९१.९४० | ३०.२८० | ३२.९ | ११०.२१९ | ३६.२६२ | ३२.९ | १३१.१४७ | ४३.१४७ | ३२.९ |
| २ | मुंबई | ८९.८८७ | ३०.८३१ | ३४.३ | १२५.९६२ | ४३.२०५ | ३४.३ | १७०.७०१ | ५८.५५० | ३४.३ |
| ३ | दिल्ली | ५७.२२८ | १८.००० | ३१.५ | ८४.१९१ | २२.४८० | २६.७ | १२२.२०४ | ३२.६२८ | २६.७ |
| ४ | चेन्नई | ४२.८९३ | १३.७६९ | ३२.१ | ५४.२२० | १५.२५१ | २८.१ | ६९.८२३ | १९.६२० | २८.१ |
| ५ | हैद्राबाद | २५.५०० | ५.००० | १९.६ | ४३.४४४ | ८.५९३ | १९.८ | ६२.९६४ | १२.४६६ | १९.८ |
| ६ | बेंगलोर | २९.२१८ | ३.६५० | १२.५ | ४१.३०३ | ५.१६२ | १२.५ | ६३.५९७ | ७.९५९ | १२.५ |
| ७ | अहमदाबाद | २५.४८० | ५.१७२ | २०.३ | ३३.१२२ | ६.७२४ | २०.३ | ४३.६२९ | ८.८५९ | २०.३ |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | पुणे | १७.२२२ | २.८०७ | १६.३ | २४.९४० | ४.०६५ | १६.३ | ३५.२९९ | ५.७५३ | १६.३ |
| ९ | कानपूर | १६.३९१ | ६.१४० | ३७.५ | २०.२९९ | ४.१७२ | २०.६ | २४.८७५ | ५.१२४ | २०.६ |
| १० | लखनौ | १०.०७६ | २.८५० | २८.३ | १६.६९२ | २.७७८ | १६.६ | २२.५८१ | ३.७४८ | १६.६ |
| ११ | नागपूर | १२.१९५ | ३.८९० | ३१.९ | १६.६४० | ५.३०८ | ३१.९ | २३.२१२ | ७.४०५ | ३१.९ |

(Source: http://mospi.nic.in/comenv2000tab7.2.11.htm)

### १.५.३ महाराष्ट्रातील झोपडपट्ट्यांची वाढ :

सन २००१ च्या जणगणनेनुसार भारतातील २६ राज्ये व केंद्रशासित प्रदेशामधील ६४० शहरांमधील झोपडपट्टीची लोकसंख्या नोंदविली आहे. त्यामध्ये महाराष्ट्रातील ६१ शहरांचा समावेश आहे. २००१ च्या जणगणनेनुसार भारतातील एकूण लोकसंख्येच्या ४२.६ टक्के लोक झोपडपट्टीमध्ये राहतात त्यापैकी महाराष्ट्रामध्ये सर्वाधिक ११.२ दशलक्ष (मिलियन) लोक झोपडपट्टीमध्ये राहतात. २००१ च्या जणगणनेनुसार मुंबई शहरामध्ये सर्वाधिक ६.५ दशलक्ष (मिलियन) लोक झोपडपट्टीमध्ये राहतात.(Census of India : 2001) सन २००१ च्या जणगणनेनुसार महाराष्ट्रातील १ मिलियन पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांची व तेथील झोपडपट्ट्यांची लोकसंख्या पुढील सारणीवरुन स्पष्ट होते.

**सारणी क्रमांक- १.५.३.१**

सन २००१ च्या लोकसंख्येनुसार महाराष्ट्रातील १ दशलक्ष (मिलियन) पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांची व तेथील झोपडपट्टीची लोकसंख्या

| अ. क्र. | शहराचे नाव | एकूण लोकसंख्या | झोपडपट्टीची लोकसंख्या | टक्के |
|---|---|---|---|---|
| १ | मुंबई | ११,९७८,४५० | ६,४७५,४४० | ५४.१ |
| २ | पुणे | २,५३८,४७३ | ४९२,१७९ | १९.४ |
| ३ | नागपूर | २,०५२,०६६ | ७३७,२१९ | ३५.९ |
| ४ | ठाणे | १,२६२,५५१ | ३५१,०६५ | २७.८ |
| ५ | कल्याण डोंबिवली | १,१९३,५१२ | ३४,८६० | २.९ |
| ६ | नाशिक | १,०७७,२३६ | १३८,७९७ | १२.९ |
| ७ | पिंपरी चिंचवड | १,०१२,४७२ | १२३,९५७ | १२.२ |

(Source : http://www.censusindia.net/results/slum2.html)

सन २००१ च्या जणगणनेनुसार महाराष्ट्रातील प्रमुख शहरांमधील झोपडपट्टीची लोकसंख्या, लिंगगुणोत्तर प्रमाण व साक्षरतेचे प्रमाण पुढीलप्रमाणे

**सारणी क्रमांक- १.५.३.२**

| अ.क्र. | शहराचे नाव | झोपडपट्टीची लोकसंख्या | लिंगगुणोत्तर प्रमाण | साक्षरतेचे प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | कोल्हापूर | ६७४६२ | ९७४ | ७२.४० |
| २ | सांगली -मिरज-कुपवाड | २६३५८ | १०२० | ६६.६७ |
| ३ | इचलकरंजी | १८११८ | ९६६ | ६५.६७ |
| ४ | सातारा | ६१७७ | ९८४ | ६०.०० |
| ५ | सोलापूर | २३१४२० | ९७० | ६८.६० |
| ६ | औरंगाबाद | १३६२७६ | ९०७ | ७९.३८ |
| ७ | अहमदनगर | २१८५२ | ९७७ | ७६.२१ |
| ८ | अकोला | १३५००९ | ९३६ | ७८.८६ |
| ९ | बीड | ७४२८३ | ९२६ | ८३.७६ |
| १० | जळगाव | ६२६९६ | ९३८ | ७५.६४ |

(Source : http ://www.populationenvis.org/Newslet/nbv1n3 p9.htm)

**१.५.४ कोल्हापूर शहरातील झोपडपट्ट्यांची वाढ:**

कोल्हापूर हे दक्षिण महाराष्ट्रातील एक कृषी, औद्योगिक शहर असल्यामुळे लोकसंख्येची नैसर्गीक वाढ, लोकांचे ग्रामीण भागातून शहरांकडे होणारे स्थलांतर इत्यादी कारणांमुळे कोल्हापूर शहराची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे अनेक नागरी समस्या निर्माण होत आहेत. त्यापैकीच झोपडपट्ट्यांची वाढ ही एक अत्यंत महत्वाची समस्या होय.

सन १९५१-६१ या सालामध्ये कोल्हापूर शहरामध्ये तोफेचा माळ, कोटीतीर्थ, अवचितनगर, कदमवाडी, डोंबारवाडा (यादवनगर) या झोपडपट्ट्या उदयास आल्या. १९६१-७१ मध्ये कसबा बावडा, भगतसिंग वसाहत या झोपडपट्ट्या उदयास आल्या. १९७१-८१ मध्ये शहराच्या विविध भागामध्ये १० झोपडपट्ट्या व १९८१ मध्ये ११ झोपडपट्ट्या विकसित झाल्या.( S.B.Zodage: 2001)

सन २००१ च्या जणगणनेनुसार कोल्हापूर शहराची लोकसंख्या ४,८५,१८३ आहे व शहरातील झोपडपट्ट्यांची लोकसंख्या ६७,४६२ आहे. कोल्हापूर महानगरपालिका झोपडपट्टी विभागाच्या मते, सध्या (मार्च २००६ पर्यंत) कोल्हापूर शहरामध्ये एकूण ५४ झोपडपट्ट्या आहेत. त्यापैकी ४४ झोपडपट्ट्या ह्या अधिकृत व १० झोपडपट्ट्या ह्या अनधिकृत झोपडपट्ट्या आहेत. शहरामधील अधिकृत व अनधिकृत झोपडपट्ट्यांची नावे, एकूण झोपड्या, लोकसंख्या, जागेची मालकी पुढील सारण्यावरुन स्पष्ट होते.

**सारणी क्रमांक १.५.४.१**

**कोल्हापूर म. न. पा. हद्दीतील अधिकृत झोपडपट्ट्यांची माहिती**

| अ. क्र. | झोपडपट्टीचे नाव | एकूण झोपड्या | लोकसंख्या | शौचालये | नळ संख्या | लाईट पोल | मालकी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कमदवाडी झोपडपट्टी | १८० | १००८ | ४ | ०६ | १२ | म.न.पा. |
| २ | सदरबाजार | ६३ | ४३३ | ६ | १५ | १५ | म.न.पा. |
| ३ | शिये पाणंद उलपे मळा | ४७ | २६२ | ८ | ०३ | ११ | म.न.पा. |
| ४ | लोणार वसाहत | ४६ | २६७ | १६ | ०५ | २५ | म.न.पा. |
| ५ | राजेंद्र नगर५५२/५५३ | १३४० | ४८२७ | ११९ | ४५ | ४५ | म.न.पा. |
| ६ | मातंग वसा. क!! बावडा सि.स.नं.५९५ | ६६ | ३९० | ३० | ०६ | १८ | सरकारी |
| ७ | तोफेचा माळ १२०३ | ७३६ | ४०६९ | १०४ | ४० | ९८ | सरकारी |
| ८ | लक्षतीर्थ वसाहत | ७३६ | ४०६९ | १०४ | ४० | ९८ | सरकारी |
| ९ | क!!बावडा सि.स.नं. १२/अ/क संकपाळनगर | १७६ | १०१६ | ३६ | १९ | २३ | सरकारी |
| १० | कोटीतीर्थ/यादवनगर | ७९४ | ६२३७ | १०२ | २३ | ५६ | सरकारी |
| ११ | अवचितनगर ४७१ ब | १२९४ | ६९९४ | २२६ | ५५ | ११५ | सरकारी |
| १२ | भगतसिंग वसा. ५९४ | ११० | ५५३ | १० | ०६ | ०७ | सरकारी |
| १३ | डोंबारवाडा | ११५ | ६९३ | ३८ | ०७ | १८ | सरकारी |
| १४ | संभाजीनगर वारे वसाहत | ३१ | ६४३ | ३७ | १० | २९ | सरकारी |
| १५ | माकडवाले वसाहत | १०८ | ३७१ | २० | ०७ | १४ | खाजगी |
| १६ | टाकाळा खण भाग | १३९ | ६१८ | १० | ०८ | ११ | म.न.पा. |
| १७ | जामसांडेकर माळ | २७९ | १३०८ | ०५ | १० | १५ | खाजगी |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १८ | अंबिका प्लॅस्टीक दक्षिण बाजू | ५६ | ३९८ | १४ | ०४ | १५ | खाजगी |
| १९ | निंबाळकर माळ | १४० | ११०३ | ३० | १५ | १६ | खाजगी |
| २० | आंतरभारती विद्यामंदीर | ६८ | ९५० | ०२ | ०६ | ०६ | सरकारी |
| २१ | शुगरमिल पाणंद (गोळीबार) | ७१ | ४४१ | २० | ०४ | २८ | खाजगी/ सरकारी |
| २२ | दत्तमंदीर | ८५ | ४५१ | २८ | ०६ | १२ | सरकारी |
| २३ | फुलेवाडी गायरान | १२४ | ६५९ | १० | ०५ | १२ | सरकारी |
| २४ | रमणमळा | १२० | ७२१ | ४० | १९ | २५ | खाजगी |
| २५ | रंकाळा खण भाग ३८१ | ७४ | ३४४ | नाही | ०३ | ०९ | खाजगी |
| २६ | कोरगांवकर कंपौंड | ३५ | २४० | ०४ | ०४ | ०८ | सरकारी |
| २७ | लाखेनगर | ५२ | १८८ | ०६ | ०५ | ०५ | म.न.पा. |
| २८ | शेंडापार्क कॉलनी | ९९ | २८८ | ०९ | १५ | २२ | सरकारी |
| २९ | कांझारभाट ५५४ | ७८ | ३१८ | ०२ | ०३ | १० | खाजगी |
| ३० | फासे पारधी | १४ | ८२ | - | ०२ | ०३ | खाजगी |
| ३१ | मोरेवाडी जवळ ५७७ | ३८ | १६१ | ०४ | ०१ | - | खाजगी |
| ३२ | सि.स.नं.५५०/५४८/ ६०८ साळोखेपार्क | ४४७ | १९३१ | ३६ | २८ | २९ | म.न.पा. |
| ३३ | विचारे माळ | १०४४ | ६३३१ | १८० | ७८ | १३० | सरकारी |
| ३४ | टिंबर मार्केट ७१४/७१८ | ८४ | ४८६ | ४० | १५ | २० | म.न.पा. |
| ३५ | घाटगे-पाटील पिछाडीस | ६४ | २९५ | ०२ | ०३ | ०४ | खाजगी |
| ३६ | कामगार चाळ, रेसकोर्स | २९ | १५९ | ०८ | ०६ | १० | सरकारी |
| ३७ | कळंबा फिल्टर हाउस, जोशीनगर | २८८ | १५९६ | २३ | १४ | २२ | खाजगी |
| ३८ | कनानगर झोपडपट्टी | ७७१ | ३२३४ | ६२ | १८ | ३४ | खाजगी |
| ३९ | बोंद्रेनगर | ६५ | ४३३ | १० | ०५ | १० | खाजगी |
| ४० | युनायटेड एजन्सी | १२९ | --- | ०८ | ०७ | ०७ | म.न.पा. |
| ४१ | जाधववाडी म.न.पा. शाळेचे पूर्वेस | ८५ | ६२१ | १० | ०५ | ०३ | सरकारी |
| ४२ | आदर्श वसाहत | ११० | ४३१ | --- | ०३ | ०६ | म.न.पा. |
| ४३ | कदमखण वाशीनाका | १६१ | ५५६ | १८ | ०७ | २२ | म.न.पा. |
| ४४ | टिंबर मार्केट गवत मंडई | ८४ | ८८८ | ०८ | ०४ | ०८ | म.न.पा. |

Source : कोल्हापूर महानगरपालिका झोपडपट्टी विभाग सन २००१ च्या जणगणनेनुसार



SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

**सारणी क्रमांक-१.५.४.२**

**कोल्हापूर महानगरपालिका हद्दीतील अघोषित झोपडपट्ट्यांची माहिती**

| अ.क्र. | झोपडपट्टीचे नांव | सर्व्हे नंबर | जागा मालक | हे. क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १ | सरकारी धान्य गोडाऊन नजीक | ८७५ | सरकारी | ०.०२ |
| २ | संगम टॉकीज उत्तर बाजू फ्रेंडस कॉलनी | ५१७ | म.न.पा. | ०.०४ |
| ३ | माजी आमदार श्री. दिलीप देसाई बंगला | ११८५ | सरकारी | ०.०३ |
| ४ | रेल्वे लाईन उत्तर बाजू टेंबलाई माळ | ३०६ | म.न.पा. | ०.०४ |
| ५ | कळंबा जेल उत्तर बाजू रस्ता लगत | ७४८ | म.न.पा. | ०.०२ |
| ६ | छाया हौसिंग सोसायटी | ४७२ | म.न.पा. | ०.०५ |
| ७ | टि. पी. स्किम नं. १ | -- | म.न.पा. | ०.१० |
| ८ | कंदलगाव नाक्यासमोर जवाहर नगर व लिंडकॉम पिछाडीस | ६२१ | म.न.पा. | ०.०२ |
| ९ | डफळे कंपौड ताराबाई पार्क | -- | म.न.पा. | ०.०१ |
| १० | शाहूपूरी गवत मंडई | १०४३ | म.न.पा. | ०.०२ |

Source : कोल्हापूर महानगरपालिका झोपडपट्टी विभागाच्या माहितीनुसार

**समारोप :**

प्रस्तुत अभ्यासाचा विषय पर्यावरणाची गुणवत्ता आणि मानवी आरोग्य हा आहे. झोपडपट्ट्यांची वाढ हा औद्योगिकरण आणि नागरीकरणाचा अपरिहार्य परिणाम आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणात जागतिक पातळीवरील नागरीकरण प्रवाह, भारतातील नागरीकरण प्रवाह, महाराष्ट्रातील नागरीकरण या पार्श्वभूमीवर जागतिक स्तरावरील झोपडपट्ट्यांची वाढ, भारतातील झोपडपट्ट्यांची वाढ, महाराष्ट्रातील झोपडपट्ट्यांची वाढ, कोल्हापूर शहरातील झोपडपट्ट्यांची वाढ कशी होत गेली याचे विवेचन करण्यात आले आहे.

संदर्भ (References) :


1. Datta Pranati (2006): 'Urbanization in India', downloaded from, http://epc2006.princeton.edu/download.aspx?submissionld=60134
2. Trends in Urbanization in the SEA Region, by Country, 1950-2030, downloaded from, http://w3.whosea.org/eip/tab8.htm
3. Ibid.
4. Datta Pranati (2006): 'Urbanization in India', downloaded from, http://epc2006.princeton.edu/download.aspx?submissionld=60134
5. Ibid.
6. Ibid.
7. Ibid.
8. Ibid.
9. Ibid.
10. Population, downloaded from, http://maharashtra.gov.in/english/ecosurvey/ecosurvey1/esm_e/cha03e.pdf
11. Zodage S.B. (2001): 'Impact of Urban Growth on Environment: A Case Study of Kolhapur, Unpublished Ph.D. Thesis, Shivaji University, Kolhapur.
12. Kaldate Sudha and B.L.Joshi (1989): 'Slums and Housing Problems, Printwell Publishers, Jaipur, Pp.2
13. गर्गे स. मा. (१९८९): 'भारतीय समाज विज्ञान कोश', खंड ३, समाजविज्ञान मंडळ, पुणे, पान क्र. ३
14. Desai A.R and Pillai S.D (1972): 'A Profile of An Indian Slum', University of Bombay, Pp.2
15. Karan Sunil Kumar, Shigeo Shikura, Hideki Harada (2003): "Living Environment and Health of Urban Poor: A Study in Mumbai, Economic and Political Weekly, volxxxviii No 34, August 23 ,2003, Pp.3575-3586
16. Sundari S. (2003): 'Quality of Life of Migrant Households in Urban Slums', downloaded from,

http://www.yorku.ca/bunchmj/ICEH/proceedings/Sundari_S_ICEH_papers
_537to552.pdf

17. Ibid.

18. Desai A.R and Pillai S.D (1970): 'Slums and Urbanization', Popular Prakashan, Bombay Pp.7

19. गर्गे स. मा. (१९८९): 'भारतीय समाज विज्ञान कोश', खंड ३, समाजविज्ञान मंडळ, पुणे, पान क्र. ३

20. Tibaijuka Anna: 'Cities Without Slums', downloaded from,
http://www.ourplanet.com/imgversn/161/tibaijuka.html

21. UN warns three billion may be living in world's slum by mid – century, Nairobi (2005), downloaded from,
http://terradaily.com/2005/050404110714.nrbi4s4I.htm

22. www.unfa.org/pds/urbanization.htm

23. http://web-unfa.org/swp/2001/english/tables.html

24. http://www.countercurrents.org/hr-whelan190204.htm

25. Key findings of the UN-HABITAT 2003 Global Report on Human Settlements, downloaded from,
http://worldbank.org/urban/symposium2003/does/papers/mutizwa-mangiza.pdf

26. Census of India (2001): 'Metadata and Brief Highlights on Slum Population', downloaded from,
http://www.censusindia.net/results/slum/metadata_highlights.pdf

27. State Wise Identified Slum Population, downloaded from,
http://mospi.nic.in/comenv200tab7.2.11.htm

28. Ibid.

29 Census of India (2001): 'Metdata and Brief Highlights on Slum Population', downloaded from,
http://www.censusindia.net/results/slum/metadata_highlights.pdf

30 Population Above One Million(2001) downloaded from,
http://www.censusindia.net/results/slum/slum2.html

31 Slum Population Maharashtra State(2001), downloaded from, http://www.populationenvis.org/Newslet/nbv1n3/nbv1n3_p9.htm

32 Zodage S.B. (2001): 'Impact of Urban Growth on Environment: A Case Study of Kolhapur, Unpublished Ph.D. Thesis, Shivaji University, Kolhapur.

33 Kolhapur Municipality, Slum Department 2001 Data

34 Ibid.



SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR